**नि. फौ. खटला क्र.११६/२०२२**

**निशाणी क्र.९२**

**:: अर्ज नि.९० वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०४ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | सुकुमार गोविंद कांबळे, |
| **वय** | : | ३८ वर्षे, **काम** : खाजगी नोकरी, |
| **राहणार** | : | येणकी, ता. उदगीर, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी सर्व आरोपींना ओळखतो. त्यापैकी आरोपी क्र.१ ते ४ आणि ६, ७ व ९ हजर आहेत. आरोपी क्र.५ व ८ गैरहजर आहेत. (अर्ज नि.९१ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.५ व ८ ची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२९/०५/२०२२ रोजी रात्री १२.३० वाजता मी कुटुंबीयांसह सर्वजण झोपलो होतो. त्यावेळी आमच्या घराच्या पत्र्यावर धोंडा पडला त्यामुळे माझ्या आईने मला उठविले. आम्ही आमच्या घराच्या बाहेर गेलो. माझ्या घरासमोरील रस्त्यावर आरडाओरड सुरू होती. मी बाहेर गेलो असता सर्व आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरू केली. आरोपी दयानंद गौतम व विजयकुमार यांनी आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली. दयानंद गेट काढून माझ्या घरामध्ये मला मारण्यासाठी आला होता आणि मला मारहाण केली. त्यावेळी माझी आई मला सोडविण्यासाठी आली. गौतम आणि विजयकुमार यांनी माझ्या आईला मारहाण केली. त्यामुळे तिच्या डाव्या पायाला, उजव्या भकाळीमध्ये दुखापत झाली. आरोपी विजयकुमार आणि गौतम कांबळे यांनी माझ्या आईचे उजव्या बाजुचे झंपर फाडले होते आणि त्यांनी घाणेरडी शिवीगाळ केली होती. आरोपी गौतम आणि विजयकुमार यांनी आम्हाला काठीने मारहाण केली होती. आरोपींनी धिंगामस्ती करून माझ्या आईच्या गळ्यातील ६० मनी दोन डोरल्याचे मंगळसूत्र घेतले व आजपर्यंत परत केले नाही. माझ्या आईने पोलीस ठाण्यामध्ये सदर घटनेबाबत अर्ज दिला. पोलिसांनी आम्हाला दवाखान्यात जाण्यास पत्र

दिले. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. मी नमूद मारहाणीच्या काठ्या बघितल्यास ओळखू शकतो. आता मला वस्तूचिन्ह अ व ब वरील दोन काठ्या दाखविल्या. ह्या त्याच आहेत.

सरतपास पूर्ण.

:: **आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.डी. पाटील यांच्यामार्फत** ::

०२. मी पदवीधर आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता परंतु त्याची तारीख मला आठवत नाही. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये माझी पोलिसांसोबत दोनदा भेट झाली. माझ्या घराचा क्रमांक ३११ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या आजूबाजूला बऱ्याच लोकांची घरे आहेत. माझ्या घराच्या आजूबाजूला १०–१५ घरे असून अंदाजे १६० लोक राहतात. कथित घटनेच्या वेळी अंदाजे २० लोक जमा झाले होते. माझ्या घराच्या पूर्वेस इंद्याबाई बिरादार यांचे घर, पश्चिमेस गुंडू पुंडू शिंदे यांचे घर, दक्षिणेस रस्ता आणि उत्तरेस आरोपी गौतमचे घर आहे. माझ्या घराला चॅनल गेट आहे.

०३. मला दोन भाऊ आणि चार बहिणी आहेत. माझ्या वडिलांना एक बहीण आहे परंतु भाऊ नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुंडू शिंदे, विठ्ठल शिंदे आणि नारायण शिंदे हे माझे नातेवाईक नाहीत. गुंडू, विठ्ठल व नारायण हे माझे चुलत भाऊ आहेत. माझ्या पंजोबाचे नाव गोविंद आहे. माझे आजोबा बापू यांना एक भाऊ लिंगराम होता. माणिकप्रभू भुताडे हे माझे नातेवाईक आहेत. परंतु पाच पिढयांपासून असलेल्या नातेसंबंधाबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. माझ्याकडे सर्वे क्र.७९/२ मध्ये १ हे. ८१ आर जमीन आहे. वर्ष २००७ मध्ये सदर जमीन माझ्या वडिलांच्या नावे झाली होती. माझ्या आजोबाच्या नावे सदर जमीन कोणत्या वर्षी होती हे मला माहीत नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, येणकी ते पोलीस ठाणे देवणी यामधील अंतर १०

किलोमीटर आहे. रात्री १.०० ते १.३० वाजताच्या दरम्यान आम्ही पोलीस ठाण्यामध्ये जाण्यास निघालो होतो आणि अर्ध्या तासामध्ये पोलीस ठाण्यामध्ये पोहचलो. पोलिसांनी लगेच फिर्याद घेतली होती. पोलिसांनी सदर फिर्याद संगणकावर टाईप करून घेतली होती. त्यानंतर आम्ही रात्री २.३० वाजताच्या दरम्यान घरी परत गेलो असेल. पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याबाबत माझ्या आईला पहिली खबर अहवालाची प्रत दिली होती.

०५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी घराच्या पत्र्यावर धोंडे टाकल्याचे, सर्व आरोपींनी शिवीगाळ केली व त्याकरिता गोळा झाले हे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गौतम व विजयकुमार यांनी माझ्या आईला मारल्याचे आणि आईला दुखापत झाल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विजयकुमार व गौतम यांनी माझ्या आईचे झंपर फाडल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी व काठीने मारल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या आईचे मंगळसूत्र घेतल्याचे खोटे सांगितले.

०६. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०५/२०२२ रोजी दयानंद कांबळे यांना शेतामध्ये मारहाण केल्याबाबत माझ्या व ईतरांच्याविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई घरातून बाहेर येत असताना चॅनल गेटमध्ये पडली व त्यामुळे तिला दुखापत झाली, चॅनल गेटला अटकून तिचे झंपर फाटले. हे म्हणणे खरे नाही की, मी आईला पडताना धरायला गेलो असता मला चॅनल गेटचा मार लागला. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर उदगीर येथे दिवाणी दावा क्र.०९/२०२० दाखल आहे. त्याचा निकाल लागलेला आहे परंतु त्याची तारीख मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याची पुढील तारीख २४/०६/२०२६ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दिवाणी दावा क्र.०९/२०२० आणि पोलीस केस मागे घेण्यासाठी आम्ही माझ्या आईला पुढे केले आणि खोटी केस दाखल केली. हे म्हणणे

खरे नाही की, मी डॉक्टरांशी संगनमत करून डॉक्टरांचे खोटे दुखापतीपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या प्रकरणात मदत होण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.२९/०५/२०२६.